## <u>प्रेस नोट</u>

### माजी एन.एस.जी.कमांडोने बांधकाम व्यवसायीकाचा विश्वासघात करुन घेतलेल्या सोन्याच्या दागिन्यांपैकी सुमारे २ किलो सोन्याचे दागिने खंडणी विरोधी पथकाकडून जप्त

पुणे शहरातील एका बांधकाम व्यवसायीकाकडे सुमारे ४ वर्षापासून सबकॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करणारा माजी एन.एस.जी. कमांडो नवनाथ बाजीराव मोहिते रा. भानसहिवरे ता. नेवासा जि. अहमदनगर व त्याचा भाऊ रघुनाथ बाजीराव मोहिते यांनी मिळून बांधकाम व्यवसायीकाचा विश्वास संपादन केला. बांधकाम व्यवसायीकाने आपल्याकडील महत्वाच्या व्यवहाराची काही कागदपत्रे तसेच वडीलोपार्जित व नवीन घेतलेले सोन्याचे दागिने वेळोवेळी वरील आरोपीतांकडे ठेवण्यास दिले होते. व्यवसायाकरीता ज्याप्रमाणे कागदपत्रे व सोन्याची आवश्यकता असेल त्यावेळी बांधकाम व्यवसायीक ती कागदपत्रे व सोन्याचे दागिने घेत होते. काही दिवसांपुर्वी बांधकाम व्यवसायीकास काही कागदपत्रांची व सोन्याच्या दागिन्यांची आवश्यकता भासल्याने त्यांनी त्याबाबत आरोपी नामे नवनाथ मोहिते याचेकडे मागणी केली असता आरोपीने सोन्याचे दागिने आपलेकडे नसल्याचे सांगून कागदपत्रांच्या फाईल्स देण्यास नकार दिला. आरोपीचे सांगणेवरुन अहमदनगर येथील किसन चव्हाण यांनी कागदपत्रे पाहिजे असल्यास २५ लाख रुपये देण्याची मागणी केली, सदरचे पैसे न दिल्यास आरोपी नवनाथ मोहिते याने आपलेकडील परवाना असलेल्या पिस्टलमधून गोळ्या घालण्याची धमकी बांधकाम व्यवसायीकास दिल्याने बांधकाम व्यवसायीकाने आरोपी नामे नवनाथ बाजीराव मोहिते, त्याचा भाऊ रघुनाथ बाजीराव मोहिते यांनी बांधकाम व्यवसायीकाने विश्वासाने दिलेले **<u>किं.रु. ७९,००,०००/- किंमतीचे २७०० ग्रॅम वजनाचे</u>** सोन्याचे दागिन्यांचा अपहार करुन आरोपी नामे किसन जगन्नाथ चव्हाण याने व्यवहाराची कागदपत्रे देण्याकरीता २५ लाख रुपयांची खंडणी मागितलेबाबत तक्रार दिल्याने खंडणी विरोधी पथकाने मार्केटयार्ड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करुन आरोपी नामे नवनाथ बाजीराव मोहिते व किसन जगन्नाथ चव्हाण यांना गुन्ह्याचेकामी अटक केली. त्यांचेकडे गुन्ह्याबाबत तपास करता आरोपी नामे नवनाथ बाजीराव मोहिते याचेकडून परवाना असलेले एक पिस्टल, ११ काडतुसे तसेच त्याचे घरातून किं.रु. २४,००,०००/-चे सोन्याचे दागिने व १७ महत्वाच्या फाईल्स व त्याने आपले नातेवाईकाच्या घरात लपवून ठेवलेला कि.रु. २७,०४,०५०/- चा १ किलो १ ग्रॅम ५०० मिलीग्रॅम वजनाचा सोन्याची वीट जप्त करण्यात आली असून आरोपीकडून एकूण **<u>कि.रु. ५१,०४,०५०/- चे १८१८ ग्रॅम ५०० मिलीग्रॅम सोन्याचे दागिने व सोन्याची वीट जप्त</u>** करण्यात आले आहेत. सदर आरोपीने सन २००१ ते सन २००९ सालापर्यंत सैन्यदलामध्ये शिपाई म्हणून नोकरी केली असून त्याने एन.एस.जी. कमांडो म्हणून सुमारे ४ वर्षे नोकरी केली आहे. सन २००९ साली त्याने सदरची नोकरी सोडून गावी गेला असून त्यानंतर तो पुणे येथे आपले भावासह सबकॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करीत होता.

**वरील कारवाई ही प्रभारी अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री दिपक साकोरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे पुणे श्री. पी.आर.पाटील व सहा. पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री. सुरेश भोसले यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. लक्ष्मण बोराटे, सहा पोलीस निरीक्षक सुनील गवळी व पोलीस स्टाफ-मंगेश पवार, धीरज भोर,कांता बनसुडे, किरण चोरगे, फिरोज बागवान,बबन बो-हाडे, व्ही.डी. पवार, रमेश गरुड, संदीप दळवी, निलेश देसाई यांनी केलेली आहे.**



